उर्ध्व तापी टप्पा - १ हतनुर प्रकल्प, जळगाव या प्रकल्पास रू. ५३६.०१ कोटी इतक्या किंमतीस चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक :- सुप्रमा-२०१९/(प्र.क्र.१९३/१९)/मोप्र-१

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- ११ सप्टेंबर, २०१९

संदर्भ:-

१. शासन निर्णय क्र. एम आय पी /४१६५/१०४२३४/आयपी-४ दि.१३.४.१९६७
२. शासन निर्णय क्र. एम आय पी / ४१७६ / १५७३७० /आयपी-४ दि. २८.२.१९७६ प्रथम सुधारीतप्रशासकीय अहवाल मान्यता.
३. शासन निर्णय क्र. युटिपी / १०८४ /६८८/३८६६/ एमएजे -आयपी-४ दि.२२.६.१९८९
४. कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव, निर्णय क्र. तापाविम / का.सं./ प्रवि-४ / १-९८/ सुप्रमा / मो.प्र. दि.११.१.१९९९

प्रस्तावना:-

उर्ध्व तापी टप्पा - १ (हतनुर) प्रकल्प तापी खोऱ्यातील जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यातील हतनुर गावाजवळ सन १९८२ मध्ये बांधण्यात आला आहे. सदर धरणाची एकूण साठवण क्षमता ३८८ द.ल.घ.मी. इतकी आहे. यापैकी अचल साठा १३३ दलघमी असून चलसाठा २५५ दलघमी आहे.

धरणाची लांबी २५८० मी. व महत्तम उंची २८.८०मी. इतकी आहे. प्रकल्पास मध्यवर्ती सांडवा आहे. सांडवा ओगी पध्दतीचा असून त्यास१२X६.५० मी. आकाराचे ४१ वक्राकार दरवाजे आहेत. सांडव्याचा संकल्पीत पुर विसर्ग २६,४८० घमी प्रती से.(९.३३ लक्ष क्युसेक्स) इतका आहे.

सदर प्रकल्पास उजव्या तिरावर ८४.९५ घमी प्रती से. क्षमतेचे एक सिंचन विमोचक आहे. सदर प्रकल्पास ९१.४० किमी लांबीचा उजवा कालवा असून या कालव्याद्वारे जळगाव जिल्ह्यातील यावल तालुक्यातील ४१ गावे (१०,३०० हे.), चोपडा तालुक्यातील ७२ गावे (२६,०३८ हे.) व रावेर तालुक्यातील ११ गावे (१५०० हे.), असे एकूण १२४ गावातील ३७,८३८ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळण्याचे नियोजन आहे. हा प्रकल्प सर्वसाधारण क्षेत्रातील आहे.

गोळे समितीच्या अहवालानुसार (दि.२८.२.१९८०) प्रकल्पाचा सुधारित संकल्पित पूर ४१,९०८ घमी प्रती से. (१४.८० लक्ष क्युसेक्स) इतका झाला असून या सुधारित संकल्पित पूराकरिता अस्तित्वातील सांडव्या व्यतिरीक्त १२ X ८मी. आकाराचे ८ वक्राकार दरवाजे असलेला अतिरीक्त सांडव्याचे काम प्रस्तावित असून सांडव्याला मुख्य धरणाशी जोडण्याकरिता ६५.५० मी. लांबीचा अनुत्सारीत भाग व २०६ मी. लांबीचे मातीधरण प्रस्तावित आहे.

या प्रकल्पास संदर्भ क्रमांक १ नुसार सन १९६३-६४ चे दरसूचीवर आधारीत रू.१२.०९ कोटी (रूपये बारा कोटी नऊ लक्ष फक्त) इतक्या किंमतीस मूळ प्रशासकीय मान्यता दिली आहे. संदर्भ क्रमांक २ नुसार सन १९७२-७३ चे दरसुचीवर आधारीत रु.३६.१० कोटी (रुपये छत्तीस कोटी दहा लक्ष फक्त) इतक्या किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. संदर्भ क्र. ३ नुसार सन १९८३-८४ चे दरसूचीवर आधारीत रु.९८.२० कोटी (रुपये अठ्याण्णव कोटी वीस लक्ष फक्त) इतक्या किंमतीस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. संदर्भ क्र. ४ अन्वये सन १९९७-९८ चे दरसूचीवर आधारीत रु.२३०.७६ कोटी (रुपये दोनशे तीस कोटी शहात्तर लक्ष फक्त) इतक्या किंमतीस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे.

दरम्यानच्या कालावधीत दरसूचीतील दरात झालेली वाढ, भूसंपादनाच्या खर्चातील वाढ,अपुरे सर्वेक्षण व इतर कारणांमुळे झालेली वाढ तसेच अनुषंगिक खर्चामुळे(इटीपी व इतर) प्रकल्प किंमतीत वाढ झाली. त्यामुळे तापी पाटबंधारे विकास मंहामंडळाने प्रकल्पाचा चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर केला आहे.

प्रकल्प अहवालावर दि. ०६/९/२०१९ रोजी झालेल्या व्यय अग्रक्रम समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली असून समितीने प्रस्ताव मा. मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने मा. मंत्रीमंडळाने जळगाव जिल्ह्यातील यावल तालुक्यातील ४१ गावे (१०,३०० हे.), चोपडा तालुक्यातील ७२ गावे (२६,०३८ हे.) व रावेर तालुक्यातील ११ गावे (१५०० हे.), असे एकूण १२४ गावातील ३७,८३८ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळण्याचे अनुषंगाने उर्ध्व तापी टप्पा - १ (हतनुर) प्रकल्पाचे काम पूर्णत्वास नेण्याच्या उद्देशाने जलसंपदा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या सन २०१६-१७ च्या दरसूचीवर आधारित रुपये ५३६.०१ कोटी इतक्या किमंतीच्या चतुर्थ सुधारित प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय -

उर्ध्व तापी टप्पा - १ (हतनुर) प्रकल्प,ता. भुसावळ, जि. जळगांव, या प्रकल्पाच्या जलसंपदा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या सन २०१६-१७ च्या दरसूचीवर आधारित रुपये ५३६.०१ कोटी (रुपये पाचशे छत्तीस कोटी एक लक्ष फक्त) [प्रत्यक्ष कामासाठी रुपये ५०१.४१ कोटी)रुपये पाचशे एक कोटी एकेचाळीस लक्ष) व अनुषंगीक खर्च रुपये ३४.६० कोटी (रुपये चौतीस कोटी साठ लक्ष(] इतक्या किंमतीस खालील अटींच्या अधीन राहून चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) प्रकल्पास केंद्रिय जल आयोगाची मान्यतेच्या आवश्यकतेबाबत दृढीकरण करुन घेण्यात यावे.
२) चतुर्थ सु.प्र.मा. प्रस्तावात पिक तीव्रता विरळ करुनही सिंचनाकरिता पाण्याची उपलब्धता विचारात घेता मात्र २०,२८० हे. क्षेत्रच सिंचनाखाली येऊ शकेल. या करिता उर्वरित १७,५५८ हे. (३७८३८-२०२८०) क्षेत्र Denotify करण्याची कार्यवाही करण्यात यावी.
३) राज्यस्तरिय तांत्रिक सल्लागार समितीच्या अहवालातील मुद्यांची पुर्तता करावी.
४) जलसंपदा विभागाने प्रचलित शासन निर्णय, नियम, CVC ची मार्गदर्शक तत्वे, वित्तीय अधिकार मर्यादा, विहीत केलेली निविदा कार्यपध्दती याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.
५) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय प्रकल्पात समावेश करू नये.
६) प्रकल्पाचे काम नियोजनानुसार व सुधारित प्रशासकीय मान्यता किंमतीच्या मर्यादेत पूर्ण करण्यात यावे.
७) संपूर्ण लाभक्षेत्रामध्ये पाणी वापर संस्था स्थापन करुन सिंचन व्यवस्थापन पाणी वापर संस्थेस हस्तांतरित करावे.
८) सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वितीकरणाच्या विविध टप्प्यांवर क्षेत्रिय अधिका-यांनी घेतलेल्या विविध निर्णयास व क्षेत्रिय अनियमितता झाली असल्यास अशा अनियमिततेस सहमती असल्याचे गृहीत धरता येणार नाही.

प्रकल्पाच्या उपशिर्षनिहाय तरतुदींचा गोषवारा परिशिष्ट “अ” मध्ये सोबत जोडला आहे.

या प्रकल्पाच्या कामावरील खर्च मागणी क्र. आय-५, मुख्य लेखाशीर्ष ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (०१) मोठे प्रकल्प - उर्ध्व तापी टप्पा-१/ उर्ध्व तापी टप्पा-२ भाग भांडवली अंशादान

(उर्वरित महाराष्ट्र) कार्यक्रम (संगणक संकेतांक) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व शासनाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.९९/२०१९ का.१४३४,दि. १५ /७/२०१९ व वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.२५५ /व्यय-१२, दि.२६/८/२०१९ अन्वये तसेच मा. मंत्रिमंडळाने दि. ०९/०९/२०१९ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१११७४०४५६९२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Tirmanwar Santosh Ramkishan

Digitally signed by Tirmanwar Santosh Ramkishan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cf0117ad341668a72bc3fcc8a83a2fab1d9b23e2ae276141178afc4dc8b5d790, serialNumber=37b5be33c57130083d7c9245fb12e91e0019861744c920676df5a5236c14b3a2, cn=Tirmanwar Santosh Ramkishan
Date: 2019.09.11 17:55:43 +05'30'

सहपत्र: परिशिष्ट "अ"

(सं. रा. तिरमनवार)
शासनाचे उप सचिव

प्रत-

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
५) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव.

परिशिष्ट- अ

प्रकल्पाची उपशीर्षनिहाय किंमत :

(किंमत रु. कोटी)

उपशीर्ष	मंजूर तृतिय सु.प्र.मा. नुसार (दरसूची 1997-98)	प्रस्तावित चतुर्थ सु.प्र.मा. नुसार(दरसूची 2017-18)	वाढ/घट	डिसेंबर 2017अखेर झालेला खर्च	उर्वरित कामाची किंमत
[A] **शिर्ष कामे**					
ए-प्राथमिक	0.17	1.53	1.36	0.74	0.79
बी-भूसंपादन	100.92	297.14	196.22	134.26	162.88
i) भूसंपादन	19.74	32.47	12.73	15.17	17.30
ii) पुनर्वसन	81.18	264.67	183.49	119.09	145.58
सी-मुख्य कामे	15.09	117.8	102.71	36.36	81.44
डी - मुख्य विमोचक	0	0	0	0	0.00
के - इमारती	1.04	1.02	-0.02	1.02	0.00
एम - वृक्षसंवर्धन	0.17	0.17	0	0.17	0.00
ओ - संकिर्ण	1.44	1.51	0.07	1.44	0.07
पी - देखभाल	0.51	0.51	0	0.51	0.00
क्यू - हत्यारे व अवजारे	0.14	0.14	0	0.14	0.00
आर - दळणवळण	0.34	0.34	0	0.34	0.00
एकूण (A)	119.82	420.16	300.34	174.98	245.18
[B] **कालवे व वितरण व्यवस्था**					
अ – प्राथमीक	0.12	0.11	-0.01	0.11	0.00
ब -भूसंपादन	4.84	4.24	-0.60	4.24	0.00
सी-कामे	7.98	8.37	0.39	8.37	8.37
डी -विमोचक	1.07	1.09	0.02	1.09	0.00
इ-प्रपात	0.00	0.00	0.00	0.00	0.00
एफ- RHT works	11.97	12.06	0.09	12.06	0.00
जी – पूल	3.21	3.27	0.06	3.27	0.00
एच - एस्केप	0.87	1.47	0.60	0.87	0.60
के- इमारती	1.45	1.67	0.22	1.67	1.67
एल - मातीकाम	13.55	11.74	-1.81	11.74	0.00
एम - वृक्षारोपण	0.50	0.54	0.04	0.54	0.00
ओ - संकिर्ण	1.69	2.43	0.74	2.43	0.00
पि - निगराणी	3.07	4.08	1.01	4.08	0.00

उपशीर्ष	मंजूर तृतिय सु.प्र.मा. नुसार (दरसूची 1997-98)	प्रस्तावित चतुर्थ सु.प्र.मा. नुसार(दरसूची 2017-18)	वाढ/घट	डिसेंबर 2017अखेर झालेला खर्च	उर्वरित कामाची किंमत
आर - दळणवळण	0.97	1.16	0.19	1.16	1.16
	0.12	0.12	0.00	0.12	0.00
III- वितरीका	34.35	28.90	-5.45	28.90	28.90
एकूण (B)	85.76	81.25	-4.51	80.65	0.60
एकूणबांधकामे (A+B)	205.58	501.41	295.83	255.63	245.78
ईटीपी चार्जेस	25.18	34.60	9.42	26.31	8.29
प्रकल्पएकूण	230.76	536.01	305.25	281.94	254.07